# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** लातूर **P.S.(ठाणे):** चाकुर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0523 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 01/10/2025 18:16

2.

| **S.No. (अ.क्र.)** | **Acts (अधिनियम)** | **Sections (कलम)** |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 15/09/2025
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 15/09/2025
**Time From (वेळेपासून):** 12:53 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:11 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 01/10/2025 **Time (वेळ):** 17:59 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 025
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 01/10/2025 17:59 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 15 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** सरपंच,विद्याबाई तेलंगे ,याचे राहते घरी मौजे , अंबुलगा ता चाकुर,चाकुर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** जगदीश नवानाथ राऊत

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1985

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | ला प्र वि लातूर,लातूर,लातुर ग्रामीण ,लातूर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | ला प्र वि लातूर,लातूर,लातुर ग्रामीण ,लातूर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9545555550

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | विद्याबाई तेलंगे | | | 1. अबुलगा ता चाकुर,चाकुर,चाकुर, लातूर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

दिनांक 01/10/2025

फिर्याद

मी जगदीश नवानाथ राऊत वय 40 वर्षे, व्यवसाय - नोकरी, पद - पोलीस निरीक्षक, नेमणुक - लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर, मो नंबर - 9545555550.
सरकार तर्फे फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर येथे मागील 4 महिन्यापासून पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे.

आम्ही दि. 12/09/2025 रोजी ला.प्र.वि कार्यालय, लातूर येथे हजर असतांना पोलीस उपअधीक्षक श्री. संतोष बर्गे यांनी बोलावून घेवून, तक्रारदार सिताराम संग्राम कोंपले यांची लाच मागणीची तक्रार असुन तुम्ही यांचेशी संपर्क करून पुढील कारवाई करा असे तोंडी आदेश दिले. आम्ही तक्रारदार सिताराम संग्राम कोंपले यांचेशी तक्रारीच्या अनुषंगाने चर्चा केली व त्यांना दिनांक 15/09/2025 रोजी सकाळी 10.30 वाजता अंबुलगा पाटी ता. चाकुर येथे येण्यास सांगितले होते.

आम्ही सापळा कारवाई आयोजीत करण्याकरीता दोन शसकीय पंच आवश्यक असल्याने दिनांक 15/09/2025 रोजी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांचे नावे पत्र देवून त्यांच्या कार्यालयाकडील दोन कर्मचारी गोपनीय कारवाई करीता पंच म्हणून उपलब्ध करून घेतले व सापळा कारवाई आयोजित केली. तक्रारदार सिताराम कोंपले यांनी पंचा समक्ष त्यांची तोंडी तक्रार सांगुण लेखी तक्रार दिली की, "मी वरील ठिकाणचा राहणारा असुन ग्रामपंचायत कार्यालय, अंबुलगा ता.चाकुर जि. लातूर येथे ग्रामरोजगार सेवक या पदावर नेमणुकीस आहे. माझी आत्या लिंबाबाई सिताराम सुर्यवंशी रा.अंबुलगा या वयस्कर आहेत. त्यांना मुल बाळ नाही. तसेच त्यांना लिहीता वाचता येत नाही. म्हणून मी त्यांच्या तर्फे दि. 10/08/2025 रोजी रमाई आवास योजनेतुन घरकुल मिळणे बाबत अर्ज व प्रस्ताव ग्रामपंचायत कार्यालय, अंबुलगा येथे सादर केला होता.

त्यानंतर काही दिवसांनी रमाई आवास योजनेच्या लाभार्थ्यांची निवड करणे करीता ग्रामसभेमध्ये ठराव घेवून यादी जाहीर झाली. सदर यादीमध्ये माझ्या आत्याचे नाव न आल्याने मी, दि. 21/08/2025 रोजी ग्रामविकास अधिकारी मठपती साहेब यांची भेट घेवून रमाई आवास योजनेच्या यादी मध्ये माझ्या आत्याचे नाव का आले नाही याबाबत विचारले. त्यावेळी मठपती साहेब यांनी मला सरपंचांना विचारण्यास सांगितले. त्यामुळे मी आमचे गावचे सरपंच विद्याबाई तेलंगे मॅडम यांना भेटून रमाई आवास योजनेच्या लाभार्थ्यांची निवड करणे करीता ग्रामसभेमध्ये घेतलेल्या ठरावामध्ये माझ्या आत्याचे नाव का आले नाही असे विचारले असता, सरपंच विद्याबाई तेलंगे यांनी सदर कामासाठी माझ्याकडे 10,000/- रूपयेची मागणी केली होती.
रमाई आवास योजनेच्या लाभार्थ्यांची ग्रामसभेमध्ये ठराव घेवून निवड करण्यासाठी कुठलीही शसकीय फीस लागत नाही. त्यामुळे सरपंच श्रीमती तेलंगे मॅडम मागत असलेली 10,000/- रूपये रक्कम ही लाच असल्याची माझी खात्री झाली आहे. सरपंच श्रीमती तेलंगे मॅडम यांना लाच दिली नाहीतर ते माझे काम करणार नाहीत या भितीपोटी मी त्यांना होकार देवून स्वमर्जीने तक्रार देण्यासाठी आलो आहे.

मी आज दिनांक 15/09/2025 रोजी सरपंच श्रीमती तेलंगे मॅडम यांची त्यांचे घरी जावून भेट घेवून त्यांचेकडे माझे आत्याचे कामासाठी चर्चा करणार आहे. सदर भेटीदरम्यान सरपंच श्रीमती तेलंगे मॅडम यांनी स्वतः किंवा इतर मार्फत माझे आत्याचे कामाकरीता लाचेची मागणी करून ती स्वतः अथवा इतरामार्फत स्विकारल्यास त्यांचेवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. आमचे गावचे सरपंच तेलंगे मॅडम यांचेशी माझा कसलाही आर्थिक/पैशाचे देवाण - घेवाणीचा व्यवहार झालेला नाही अथवा बाकी नाही. त्यांचे व माझे कुठलेही वैर नाही.'' अशा आशयाची लेखी तक्रार दिली. सदर तक्रार वाचुन पाहुन मी व दोन्ही पंचानी त्यावर सहया केल्या आहेत.

त्यानंतर लाच मागणी पडताळणी करण्याचे ठरवून तक्रारदार सिताराम कोंपले व सरपंच श्रीमती तेलंगे यांचेत काय चर्चा होते ते डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करण्याचे ठरवुन आम्ही दोन्ही पंचास व तक्रारदार यांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बाबत सविस्तर माहीती देवुन त्यामध्ये नविन कोरे मेमरीकार्ड आम्ही दोन्ही पंचासमक्ष फोडुन ते डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये टाकुन त्यात पुर्वीचे कोणतेही संभाषण ध्वनीमुद्रीत झाले नसले बाबत दोन्ही पंचाना खात्री करुन देण्यात आली.

त्यानंतर आमचे सुचने नुसार पो.कॉ/1256 गंभीरे यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये आमचे, तक्रारदार व दोन्ही पंचाचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत केले. लाच मागणी पडताळणी पुर्वी आम्ही तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकातील सदस्य यांना सुचना दिल्या व तक्रारदार सिताराम कोंपले यांनी वर नमुद प्रमाणे दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने लाचेची मागणी पडताळणी करण्यासाठी पो.कॉ/1256 गंभीरे यांचे मदतीने 12.53 वाजता डिजीटल व्हॉइस रेकॉर्डरचे बटन चालू करून तक्रारदार यांचे गळयात अडकावुन तक्रारदार यांना पंच क्र. 1 श्रीमती गांजुरे यांच्या सोबत सरपंच श्रीमती तेलंगे यांची भेट घेण्यासाठी मौजे अंबुलगा येथे सरपंच तेलंगे यांचे घरी रवाना करून आम्ही, पंच क्र. 02 व सापळा पथकातील ईतर सदस्य खाजगी वाहनामध्ये थांबुन राहीलो.

त्यानंतर अंदाजे 13.11 वाजण्याच्या सुमारास तक्रारदार सिताराम कोंपले व पंच क्रंमांक 1 श्रीमती गांजुरे हे परत सापळा पथकाच्या वाहनाजवळ आले असता पो.कॉ/1256 गंभीरे यांचे मदतीने तक्रारदार यांच्याकडील व्हॉईस रेकॉर्डर बंद केले. आम्ही, पंच क्रं. 1 श्रीमती गांजुरे यांना ते तक्रारदार यांचे सोबत सरपंच श्रीमती तेलंगे यांची भेट झाल्यानंतर तक्रारदार यांचे कामासंदर्भात व लाचेच्या रक्कमे संदर्भात काय चर्चा झाली? याबाबत विचारणा केली असता पंच क्रमांक 1 श्रीमती गांजुरे यांनी सांगितले की, "मी व तक्रारदार सिताराम कोंपले असे मिळुन मौजे अंबुलगा येथे सरपंच तेलंगे यांचे घरी भेट घेण्याकरीता गेलो असता, तक्रारदार यांनी ईशा-याने सदर महिला ही सरपंच तेलंगे असल्याचे मला सांगीतले. त्यानंतर तक्रारदार व सरपंच श्रीमती तेलंगे यांच्यात कामाच्या व लाचेच्या अनुशंगाने चर्चा झाली तक्रारदार म्हणाले.... नमस्कार विद्याताई तेलंगे... आपलं... आत्याचं.... रमाईचं घरकुल हय.... त्यावर सरपंच तेलंगे म्हणाल्या... हं..... त्यावर तक्रारदार म्हणाले... ठरावामधी नाव घालायचंय...त्यावर सरपंच तेलंगे म्हणाल्या... हं... एक हायका दोन हाय... त्यावर तक्रारदार म्हणाले...एकचं हाय घरकुल... लिंबाबाई सुर्यवंशी.... आत्याच्या नावानं करा... त्यावर सरपंच तेलंगे म्हणाल्या... दहा हजार... आणले का? त्यावर तक्रारदार म्हणाले... आधी हे काम करा... नंतर काय हय ते सांगा क्लियर.... त्यावर सरपंच तेलंगे म्हणाल्या... दहा हजार द्या....त्यावर तक्रारदार म्हणाले... किती?.... त्यावर सरपंच तेलंगे म्हणाल्या... दहा हजार.... त्यावर तक्रारदार म्हणाले... दहा हजार..... तुमच्याकडं देवू का? नागूकडं देवू? त्यावर सरपंच तेलंगे म्हणाल्या... नागुकडं..... त्यावर तक्रारदार म्हणाले... नागुकडं पैसे द्यायचे ... काय कमी करा..... त्यावर सरपंच तेलंगे म्हणाल्या... काय कमी करावं आता.... त्यावर तक्रारदार म्हणाले...चला ठिक हय...असे म्हणून आम्ही तेथुन निघुन सापळा पथकाच्या वाहनाजवळ परत आलो." अशी हकीकत पंच क्रमांक 1 श्रीमती गांजुरे यांनी सांगितली.

आम्ही, दोन्ही पंचासमक्ष तक्रारदार यांना ते व पंच क्रमांक 1 श्रीमती गांजुरे असे सरपंच तेलंगे यांची भेट घेण्यासाठी गेल्यानंतर तुमच्या कामासंदर्भात व लाचेच्या रक्कमे संदर्भात सरपंच तेलंगे यांचेशी काय चर्चा झाली? याबाबत विचारणा केली असता तक्रारदार सिताराम कोंपले यांनी थोडया वेळा पुर्वी पंच क्रमांक 1 श्रीमती गांजुरे यांनी सांगितलेल्या हकीकतीशी मिळती जुळती हकीकत सांगितली. त्यानंतर तक्रारदार सिताराम कोंपले व सरपंच तेलंगे यांचे व्हॉईस रेकॉर्डर मधील ध्वनीमुद्रीत झालेले संभाशण पो.कॉ/1256 गंभीरे यांचे मदतीने चालू करून सर्वांनी ऐकले असता ते पंच क्रमांक 1 श्रीमती गांजुरे यांनी सांगितले प्रमाणे बरोबर असल्याची खात्री केली.

वरील झालेल्या संभाशणावरुन तक्रारदार सिताराम कोंपले यांना नागु बाबत विचारले असता, तक्रारदार यांनी सांगितले की, नागु तेलंगे हा सरपंच श्रीमती तेलंगे यांचा मुलगा असुन, तो तहसील कार्यालय, चाकुर येथे कोतवाल या पदावर नेमणुकीस आहे. तक्रारदार यांच्या नमुद कामासाठी सरपंच श्रीमती तेलंगे यांनी तक्रारदार यांचेकडे पंचासमक्ष दहा हजार द्या... नागुकडं....असे म्हणून...लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम सरपंच विद्याबाई तेलंगे यांचा मुलगा नागु तेलंगे व्यवसाय - नौकरी, पद - कोतवाल, नेमणुक- तहसील कार्यालय, चाकुर याचेकडे देण्यास सांगितली. त्यानुसार पुढील लाच स्विकृती सापळा कार्यवाही ही दिनांक 16/09/2025 रोजी करण्याचे ठरवुन आम्ही सर्वांना गोपनियतेबाबत योग्य त्या सुचना दिल्या.

दिनांक 18/09/2025 रोजी सापळा कार्यवाही चालू करून नागू तेलंगे यांची लाच स्विकृती कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानंतर सापळा कारवाई अनुशंगाने तक्रारदार सिताराम कोंपले व सरपंच श्रीमती तेलंगे यांचा मुलगा नागू तेलंगे यांचेत काय चर्चा होते ते डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करण्याचे ठरवुन त्यामध्ये नविन कोरे मेमरीकार्ड आम्ही दोन्ही पंचासमक्ष फोडुन ते डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये टाकुन त्यात पुर्वीचे कोणतेही संभाषण ध्वनीमुद्रीत झाले नसले बाबत दोन्ही पंचाना खात्री करुन देण्यात आली.

त्यानंतर आमचे सुचने नुसार पो.कॉ/1256 गंभीरे यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये आमचे, तक्रारदार व दोन्ही पंचाचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत केले. सरपंच विद्याबाई तेलंगे यांनी मागणी केलेली 10,000/- रुपये लाचेची रक्कम सर्वानुमते देण्याचे ठरवुन आम्ही तकारदार सिताराम कोंपले यांना लाचेची रक्कम हजर करण्यास कळवीले असता तकारदार सितारात कोंपले यांनी त्यांचेजवळील 10,000/-रूपये रक्कम हजर केली. आम्ही दिलेल्या सुचनेवरून पंच क्रमांक 02 राजपूत यांनी नागु तेलंगे यांना द्यावयाचे 10,000/-रुपये (त्यामध्ये 500/- रुपये दराच्या 20 भारतीय चलनी नोटा) याची पाहणी केली व नोटांचे क्रमांकाची पडताळणी केली व पडताळणी केल्यावर आम्ही अॅन्थ्रासीन पावडर व अल्ट्राव्हायलेट दिव्याचे गुणधर्म दोन्ही पंच व तक्रारदार यांना समजावून सांगितले. पो.अं./1488 जाधव यांनी अॅन्थ्रासीन पावडरयुक्त लाचेची रक्कम 10,000/- रुपये तक्रारदार यांच्या पॅन्टच्या पाठीमागील उजव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवली.
त्यानंतर आमचे सुचनेनुसार पो.अं./1256 गंभीरे यांनी 12.27 वा. डिजीटल व्हॉईस रेकॉर्डचे बटन चालु करुन ते तक्रारदार यांच्या गळ्यात आडकावुन तकारदार कोंपले व पंच क्रमांक 1 श्रीमती गांजुरे यांना नागु तेलंगे यांचेकडे रवाना केले. व आम्ही, पंच क्रमांक 2 राजपूत व सापळा पथकातील सदस्य असे सर्वजण त्यांचेवर लक्ष ठेवुन तहसील कार्यालय, चाकुरचे बाहेर लाच स्वीकृतीच्या ईशा-याची वाट पाहत थांबुन राहिलो.
त्यानंतर अंदाजे 12.42 वाजण्याचे सुमारास तक्रारदार कोंपले व पंच क्रमांक 1 श्रीमती गांजुरे हे सापळा पथकाजवळ आले. पो.अ./1256 गंभीरे यांनी तक्रारदार यांचे जवळील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर आपले ताब्यात घेवुन त्याचे बटन बंद केले. आम्ही पंच क्रमांक 1 श्रीमती गांजुरे यांना विचारणा केली की, ते तक्रारदार कोंपले यांचेसोबत नागु तेलंगे यांची भेट घेण्यासाठी गेल्यापासुन ते सापळा पथक जवळ परत येई पर्यंत तक्रारदार व नागु तेलंगे यांच्यात लाचेच्या देवाण घेवाणी बाबत काय बोलणे झाले? त्यावेळी पंच क्रमांक 1 श्रीमती गांजुरे यांनी सांगीतले की, " मी व तक्रारदार असे नागु तेलंगे यांची भेट घेण्याकरीता तहसील कार्यालय, चाकुर येथे जात असताना तहसील कार्यालयाचे आवारात आल्यानंतर तक्रारदार यांनी नागु तेलंगे यांना फोन करून बाहेर चहाचे हॉटेलवर बोलावले. मी व तक्रारदार तहसील कार्यालया समोरील चहाचे हॉटेलवर नागु तेलंगे यांची वाट पाहत थांबलो. थोडया वेळानी नागु तेलंगे चहाचे हॉटेलवर आले त्यावेळी नागु तेलंगे म्हणाले... बोल की.... अं...गर्दी हाय र...मधी...त्यावर तक्रारदार म्हणाले...गर्दीचा विशय नाही...काल काम झालय ग्रामसभा झाली...ग्रामसभेमध्ये काम झालं...म्हणल्या प्रमाण...त्यावर नागु तेलंगे म्हणाले... ये पैसे घेणा मी...तीथ काका पशी निहून दे...काकाला... पावती फाड की...पावती फाड नाय येडायस का... त्यावर तक्रारदार म्हणाले... येडयावनी करणुक ...हेव इकड ये... काकाला बोल्लास का तू... नागु तेलंगे म्हणाले... काय कर काका पशी जा...काका पवती देतेत....बॉड बींड ...ही कराव लागल की तुला... त्यावर तक्रारदार म्हणाले... चालतय हीच बोलायच होत...असे म्हणुन तक्रारदार कोंपले व मी सापळा पथकाचे जवळ आलो.अशी हकिकत पंच क्रमांक 1 श्रीमती गांजुरे यांनी सांगितली.
आम्ही तक्रारदार कोंपले यांचेकडुन ताब्यात घेतलेला व्हॉईस रेकॉर्डर पो.अ./1256 गंभीरे यांचे मार्फतीने चालु करुन मेमरी कार्डमधील नागु तेलंगे व तक्रारदार यांचेत लाचेच्या देवाणघेवाणी संदर्भात झालेले संभाषण सर्वानी ऐकले सदरचे व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरीकार्डमध्ये झालेले संभाषण वर नमुद प्रमाणे पंच क्रमांक 1 श्रीमती गांजुरे व तक्रारदार यांनी सांगीतलेल्या हकीकतीप्रमाणे मिळतेजुळते असल्याचे दिसुन आले
वरील संभाशणावरून नागु तेलंगे यांनी सरपंच विद्याबाई तेलंगे यांनी मागणी केलेली 10,000/-रू लाच रक्कम स्विकारली नाही व रक्कम घेवून बॉड व पावती फाडण्यासाठी काका यांचेकडे जाण्यास सांगितले. आम्ही तक्रारदार कोंपले यांना काका यांच्याबद्दल विचारले असता, तक्रारदार यांनी सांगितले की, गोविंद काषिनाथ जाधव हे अंबुलगा गावाचे उपसरपंच आहेत. गावामध्ये त्यांना सर्व काका या नावाने ओळखतात व ते अंबाजोगाई जि. बीड येथे राहण्यास आहेत. ते आधुन मधुन अंबुलगा येथे येत असतात.
नागु तेलंगे यांचे म्हणण्यानुसार उपसरपंच जाधव ऊर्फ काका यांना देण्यासाठी सांगितलेल्या रकमेची खात्री करण्यासाठी पुढील सापळा कारवाई ही गोविंद काशिनाथ जाधव, उपसरपंच अंबुलगा ऊर्फ काका यांचेविरूध्द करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले व लाच स्विकृती कार्यवाही स्थगित करण्यात आली.
दिनांक 24/09/2025 रोजी पुढील सापळा कारवाई अनुषंगाने तक्रारदार सिताराम कोंपले व गोविंद काषिनाथ जाधव, उपसरपंच अंबुलगा ऊर्फ काका यांचेत काय चर्चा होते ते डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करण्याचे ठरवून नागू तेलंगे यांचे सांगणे प्रमाणे गोविंद काषिनाथ जाधव, उपसरपंच अंबुलगा ऊर्फ काका यांना देण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानंतर आमचे सुचनेवरून पो.अं./1488 जाधव यांनी अॅन्थ्रासीन पावडरयुक्त लाचेची रक्कम 10,000/- रुपये तक्रारदार यांच्या पॅटच्या समोरील उजव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवली. आमचे सुचनेनुसार पो.अं./1256 गंभीरे यांनी 12.47 वा. डिजीटल व्हॉईस रेकॉर्डचे बटन चालु करून ते तक्रारदार यांच्या गळ्यात आडकावुन तक्रारदार कोंपले व पंच क्रमांक 1 श्रीमती गांजुरे यांना गोविंद काषिनाथ जाधव, उपसरपंच

अंबुलगा ऊर्फ काका यांचेकडे रवाना केले. आम्ही, पंच क्रमांक 2 राजपूत व सापळा पथकातील सदस्य असे सर्वजण त्यांचेवर लक्ष ठेवुन अंबुलगा गावा मध्ये लाच स्विकृतीच्या ईशा-याची वाट पाहत थांबुन राहिलो.
त्यानंतर अंदाजे 13.05 वाजण्याचे सुमारास तक्रारदार कोंपले व पंच क्रमांक 1 श्रीमती गांजुरे हे सापळा पथकाजवळ आले. पो.अ./1256 गंभीरे यांनी तक्रारदार यांचे जवळील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर आपले ताब्यात घेवुन त्याचे बटन बंद केले. आम्ही पंच क्रमांक 1 श्रीमती गांजुरे यांना विचारणा केली की, ते तक्रारदार कोंपले यांचेसोबत गोविंद काशिनाथ जाधव, उपसरपंच अंबुलगा ऊर्फ काका यांची भेट घेण्यासाठी गेल्यापासुन ते सापळा पथका जवळ परत येई पर्यंत तक्रारदार व गोविंद काशिनाथ जाधव, उपसरपंच अंबुलगा ऊर्फ काका यांच्यात लाचेच्या देवाण घेवाणी बाबत काय बोलणे झाले? याबाबत विचारले असता पंच क्रमांक 1 श्रीमती गांजुरे यांनी सांगीतले की, " मी व तक्रारदार असे गोविंद काषिनाथ जाधव, उपसरपंच अंबुलगा ऊर्फ काका यांची भेट घेण्याकरीता ग्रामपंचायत कार्यालय, अंबुलगा येथे जात असताना अंबुलगा गावातील मेन रोडवर गोविंद काशिनाथ जाधव, उपसरपंच अंबुलगा ऊर्फ काका यांची भेट झाली त्यावेळी तक्रारदार कोंपले यांनी... काका.... काका...म्हणून हाक मारली...त्यावर उपसरपंच जाधव म्हणाले... हं....काय बोल? त्यावर तक्रारदार म्हणाले... ते आत्याचं...... नागुचं माझं बोलणं झालं.... नागु म्हणला... काकाकडं दे..... साहेबाचं बोलणं झालं... त्यावर उपसरपंच जाधव म्हणाले... पैसे माझ्याकडं नको देवू ते...माझ्याकडं नको देवू.... नागु काय म्हणला बोल...पैसे राहू तुझ्याकडचं..... पैसे देवू नको..... मग आता ठरावात नाव घालायचं म्हणून पैसे द्यायचेत का? त्यावर तक्रारदार म्हणाले... मी मधी बगा येणार नाही..... तिथं मी आलं का..... उग तमाषा होवू लालाय..... चार माणसं माझ्यासंग येवू लालेत..... हे पैसे राहू द्या.... मी लातूरहून काय येणं झालावं आता... मला काही ईकडं येणं होत नाही.... काही नाही.... त्यावर उपसरपंच जाधव म्हणाले...पैसे माझ्याकडं देवू नको... मी कुणाचे आतापर्यंत घेतले नाही.... तुझे कषाला घेवू..... काम झाल्यानंतर पुन्हा कुणाला द्यायचे दे.... ते तुझे तुझंतुनचं द्यायचे... त्यावर तक्रारदार म्हणाले...येवू का मग... असे म्हणुन तक्रारदार कोंपले व मी सापळा पथकाचे जवळ आलो. अषी हकिकत पंच क्रमांक 1 श्रीमती गांजुरे यांनी सांगितली.
आम्ही तक्रारदार कोंपले यांचेकडुन ताब्यात घेतलेला व्हॉईस रेकॉर्डर पो.अ./1256 गंभीरे यांचे मार्फतीने चालु करून मेमरी कार्डमधील गोविंद काषिनाथ जाधव, उपसरपंच अंबुलगा ऊर्फ काका व तक्रारदार यांचेत लाचेच्या देवाणघेवाणी संदर्भात झालेले संभाषण सर्वांनी ऐकले सदरचे व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरीकार्डमध्ये झालेले संभाषण वर नमुद प्रमाणे पंच क्रमांक 1 श्रीमती गांजुरे व तक्रारदार यांनी सांगीतलेल्या हकीकतीप्रमाणे मिळतेजुळते असल्याचे दिसुन आले. गोविंद काशिनाथ जाधव, उपसरपंच अंबुलगा ऊर्फ काका यांनी सरपंच विद्याबाई तेलंगे यांनी मागणी केलेली 10,000/-रू लाच रक्कम स्विकारली नाही. त्यावरून सदर सापळा कारवाई स्थगित करण्यात आली.
तरी यातील इतर लोकसेविका विद्याबाई तेलंगे, पद- सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय, अंबुलगा ता.चाकुर जि. लातूर यांनी तक्रारदार यांची आत्या लिंबाबाई सिताराम सुर्यवंशी रा.अंबुलगा यांना रमाई अवास योजनेच्या लाभार्थ्यांच्या यादी मध्ये ग्रामसभेमध्ये ठराव घेवून निवड करण्याकरिता म्हणून दिनांक 15/09/2025 रोजी पंचासमक्ष 10,000/- रुपये लाचेची मागणी करून लाच रक्कम मुलगा नागू तेलंगे यांचेकडे देण्यास सांगितली. दिनांक 18/09/2025 रोजी नागू तेलंगे यांचे विरूध्द सापळा कारवाई आजमावली असता, नागू तेलंगे यांनी लाच रक्कम स्विकारली नाही व सदर रक्कम गोंविंद जाधव, उपसरपंच, ग्रामपंचायत कार्यालय, अंबुलगा यांचेकडे जमा करून पावती फाडण्यास सांगितले. नागू तेलंगे यांचे म्हणण्यानुसार खात्री करण्यासाठी दिनांक 24/09/2025 रोजी गोंविंद जाधव, उपसरपंच, ग्रामपंचायत कार्यालय अंबुलगा यांचे विरूध्द सापळा कारवाई आजमावली असता त्यांनी लाचेची रक्कम स्विकारली नाही.
म्हणुन माझी इतर लोकसेवक श्रीमती विद्याबाई तेलंगे, सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय, अंबुलगा ता. चाकुर जि. लातूर यांच्या विरुध्द भ्रष्ट्राचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7 अन्वये सरकार तर्फे फिर्याद आहे.

ही

फिर्याद दिली

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

BALAJI RAMRAO BHANDE(I (Inspector)) / POBN84557 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्यां कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): BALAJI RAMRAO BHA

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): POBN84557

प्रत मिळाली आहे.

सिताराम संग्राम कोळेकर